# ग्रामपंचायत कार्यालय खैरी/वलमाझरी

## पं. स. साकोली, ता. जि. भंडारा


Email-gpkhairiwalmazari@gmail.com

| सरपंच | ग्रामपंचायत अधिकारी | उपसरपंच |
|---|---|---|
| पुरुषोत्तम गणेशराम रुखमोडे | नरेश पुरुषोत्तम शिवणकर | सत्यपाल रामदास मरसकोल्हे |
| मो.क्र.७०२०९४२६८९ | मो.क्र.९९२२५५७२१६ | मो.क्र.९१६८११३०३५ |


### - ग्रामसभेची जाहीर सुचना -

दिनांक /११/२०२५
जा क्र

सर्व गावकरी सभेच्या सदस्यांना सुचित करण्यात येते की, गट ग्रामपंचायत खैरी/वलमाझरी ची ग्रामसभा दिनांक २८/११/२०२५ रोज शुक्रवार ला ठिक सकाळी ११:०० वाजता स्थळ ग्रामपंचायत कार्यालय खैरी/वलमाझरी **मा.सरपंच श्री. पुरूषोत्तम गणेशराम रूखमोडे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी घेण्यात येईल.सबब वेळेवर उपस्थित राहावे.

### -: सभेचे विषय :-

१. मागील ग्रामसभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.
२. सन २०२५–२०२६ चा अर्धवार्षिक जमाखर्च अहवाल वाचन करून मंजुर करणे.
३. आर्थिक वर्षात करावयाची कामांना मंजुरी देणे.
४. शासकिय परीपत्रक वाचन करणे.
५. सन २०२६–२०२७ चा तयार अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६. मुख्यमंत्री ग्रामसमृध्द अभियान स्पर्धा बाबद चर्चा करणे.(पंचायत राज)
७. सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्थापन समिती गठित व उपक्रमास अधिकृत मान्यता देणे.(आमगाव/खु.)
८. कर वसुली बाबद चर्चा करणे.
९. मौजा पिटेझरी येथिल प्रतिक्षालय व समोरील जागा खाली करण्याबाबद चर्चा करून निर्णय घेणे.
१०. मा.अध्यक्षांच्या परवांगीने येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

| सही/- | सही/- |
|---|---|
| (पुरूषोत्तम ग. रूखमोंडे) | (नरेश पी. शिवणकर) |
| सरपंच | ग्रामपंचायत अधिकारी |

प्रतिलीपी:– १) मा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती साकोली यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२) मा.पोलीस निरीक्षक,पोलीस ठाणा साकोली यांना माहीती तथा सभेत उपस्थित राहण्यास समादराने सविनय सादर.
३) सर्व मुख्याध्यापक,अंगणवाडी सेविका,आशा सेविका,बचत गट प्रमुख यांना सभेत उपस्थित राहण्यास सादर.
४) ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता सादर.

### -: ग्रामसभेची नियमावली :-

१) ग्रामसभेच्या सभेमध्ये कोनतीही सुचना मांडण्याची एखादया व्यक्तीची ईच्छा असल्यास त्याने ती सुचना तारखेच्या कमीत कमी दोन दिवसा आधी सरपंचा कडे किंवा त्यांच्या अनुउपस्थित उपसरपंचा कडे पाठविले पाहीजे.नोटीस प्रसिध्द होण्यापुर्वी किंवा प्रसिध्द झाल्यानंतर मिळालेली अशी कोनतीही सुचना ग्रामसभेच्या सभेपुढे ठेवण्यात यावी किंवा किंवा त्याच्या अनुउपस्थित उपसरपंचाने ठरविले पाहीजे.२)सरपंचास किंवा त्या अनुउपस्थित उपसरपंचास पुढिल कोनत्याही कारणावरून अशी सुचना मांडल्याची परवानगी नाकारण्याचा अधिकार आहे.(अ)अशी सुचना बदनामीच्या स्वरूपाची असुल तर (ब)अशा सुचनेतील भाषा अपसमानास्पद असेल तर(क)अशी सुचना लोकशाहीत विरोध असेल तर(ड)अशी सुचना शुल्लक स्वरूपाची असेल तर(ई)अशी सुचना ही न्याय प्रविष्ठ बाबींच्या संबंधातील सुचना असेल तर ३)एखादी सुचना ग्रामसभेच्या अधिकारा बाहेरची आहे.असे अध्यक्षकांना वाटल्यास त्यावर चर्चा करण्याची नाकारण्याचा त्यास अधिकार आहे.४)सभेतील कामकाजाचे नियम करणे आणि व्यवस्था राखने हे अध्यक्षकांचे कर्तव्य असेल तर त्या करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार त्यास असतिल.५)जर कोणताही सदस्य अध्यक्षकांच्या अधिकाराचा अनादर करीत किंवा सभेत अडथळा निर्माण करणारी किंवा त्रासदायक वर्तवणुक केल्याबद्दल तो दोषी असेल किंवा सभेच्या कामकाजात तो व्यत्यय आणील तर अशा इसमास सभेतुन काढुन काढण्याचा अधिकार असेल.६)मतदान यादीत ज्यांचे नाव आहे त्यांनाच ग्रामसभेची सुचना मांडण्याची व बोलण्याची परवाणगी आहे.

| (पुरूषोत्तम ग. रूखमोडे) | (नरेश पी. शिवणकर) |
|---|---|
| सरपंच | ग्रामपंचायत अधिकारी |
| सरपंच गट ग्रा. पं. खैरी/वलम। पं. स. साकोली | ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत खैरी/वलमाझरी पं.स.साकोली, जि. भंडारा |

**स्वच्छ सुंदर हरित ग्राम**

Bhumi Earth